# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक:
०२०—२५६०१२०६
फॅक्स: ०२०—२५६०१२०६

**परीक्षा समन्वय विभाग**
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

Website: www.unipune.ac.in
e-mail: coe@unipune.ac.in


संदर्भ : परीक्षा—समन्वय / ३४३

दिनांक: ११.०८. २०२०.

प्रति,

मा. प्राचार्य,
संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालय,
पुणे, नाशिक, अहमदनगर जिल्हा

विषय: अभियांत्रिकी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या (M.E./MTech Prosect/Dissertation) परीक्षा ऑनलाइन पध्दतीने घेणेबाबत.

संदर्भ : परीक्षा विभाग पत्र क्र. परीक्षा / ४१७, दिनांक ०१ जून, २०२०.

महोदय / महोदया,

परीक्षा विभागाने अभियांत्रिकी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या Project/Dissertation परीक्षा ३१ ऑगस्ट,२०२० पर्यंत प्रचलित पध्दतीने घेण्यात याव्यात असे पत्राद्वारे १ जून, २०२० रोजी संबंधित संलग्न महाविद्यालयांना कळविलेले होते. कोरोना विषाणूच्या (Covid-19) प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांना संलग्नित महाविद्यालयात प्रत्यक्ष हजर राहून Project/Dissertation परीक्षा देणे शक्य नाही. सदर परिस्थिती विचारात घेता या परीक्षा Video Conferencing Facility (Google Meet, Skype, etc) इतर सुविधा वापरुन घेण्यात याव्या. पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी संबंधित केलेल्या कामाचे Project/Dissertation अंतर्गत मार्गदर्शक व विद्यापीठाने ठरवून दिलेल्या बहि:स्थ परीक्षकासमोर सादर करावयाचे आहे. सदर परीक्षकांचे मानधन Online पध्दतीने संलग्नित महाविद्यालयाकडून परीक्षकांना देण्यात यावे. त्याचा परतावा प्रचलित पध्दतीनुसार विद्यापीठाकडून दिला जाईल. प्रवास खर्च व इतर संबंधित खर्च हा परीक्षांसाठी देय राहणार नाही याची नोंद घ्यावी. वरील परीक्षा ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत पूर्ण करुन इंटरनल मार्कस् वेबपोर्टलवर प्रचलित पध्दतीनुसार परीक्षांचे गुण विद्यापीठाकडे पाठवावे. संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी / संचालकांनी याबाबतची माहिती संबंधितांना कळवावी. ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ